# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
## प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
## दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२-२३२८५८
rdc_washim@rediffmail.com


**विषय :-जिल्हाधिकारी कार्यालयाकरीता स्वच्छतेचे साहित्य पुरविणे करीता दरपत्रक मागविणे बाबत.**

जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे एका वर्षाच्या कालावधीसाठी सोबत सादर केलेल्या यादीप्रमाणे कार्यालयास लागणाऱ्या स्वच्छतेचे साहित्य खरेदीसाठी नोंदणीकृत पुरवठादार व्यक्ती,संस्था इ.कडुन विहीत नमुण्यात सिलंबद पाकीटात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

इच्छुक नोंदणीकृत पुरवठादार व्यक्ती,संस्था पुरवठादार यांनी दिनांक २४/०८/२०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सिलबंद पाकीटात दरपत्रके सादर करावीत त्यानंतर प्राप्त दरपत्रकाचा विचार केल्या जाणार नाही.तसेच प्राप्त दरपत्रके दिनांक २८/०८/२०१७ ला ४.०० वाजता मा.अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांच्या समक्ष उघडण्यात येतील.दरकराराच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे विहीत करण्यात आल्या आहेत.

## अटी व शर्ती :-

१. सदर दरकरार मंजुरीचा कालावधी हा दरकरार मंजुरी आदेशाच्या दिनांकापासुन एका वर्षाचा असेल.
२. नोंदणीकृत पुरवठादार / संस्थेने शासकीय कार्यालयास स्वच्छतेचे साहित्य पुरवठा केल्याचा अनुभव असल्यास तसे अनुभव प्रमाणपत्र जोडावे. तसेच पुरवठादारास कोणत्याही प्रकारचा अग्रीम दिल्या जाणार नाही.
३. कार्यालयाच्या मागणी प्रमाणे लेखन सामग्री व साहित्य तात्काळ कार्यालयास पुरवावे लागेल सदर साहीत्य कार्यालयात पुरविण्याची जबाबदारी पुरवठादारची/संस्थेची राहील त्याकरीता कार्यालयाकडुन कोणतेही वाहन भाडे अथवा हमाली उतरणावळ/चढणावळ देय राहनार नाही.बंद लिफाफा दरपत्रके उघडण्याच्या वेळी दरपत्रकधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.
४. सदर दरकरारातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास किंवा करारनाम्यातील पालन समाधानकारकरित्या न झाल्यास किंवा दरपत्रक मंजुर होणे बाबत खाते बाहय अथवा खात्यांतर्गत दबाव आणल्यास सदर दरकरार नामंजुर करण्यात येतील.
५. कोणत्याही बाबतीत विवाद उदभवल्यास मा.जिल्हाधिकारी, वाशिम यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.दरकरारा संबधीच्या वादाकरीता वाशिम शहर हेच न्यायालयीन कार्यक्षेत्र राहील.
६. पुरवठादारास पुरविण्यात येणारे साहीत्य हे उच्च गुणवत्ता व चांगल्या प्रतिचे पुरविणे आवश्यक आहे.
७. पुरवठादार/संस्था दरकरार झालेल्या कालावधीत वस्तुंच्या दरामध्ये कोणत्याही प्रकारची दरवाढ करता येणार नाही तसेच पुरवठादाराकडुन सादर करण्यात येणाऱ्या देयकांमध्ये कोणत्याही प्रकारचे कर लावता येणार नाही.
८. सदर दरकरारामधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबत व विहीत वेळेत कार्यालयीन साहीत्याचा पुरवठा करण्याबाबत स्वतंत्रपणे रु १००/-च्या बॉन्डपेपरवर आदेशाच्या दिनांकाच्या १५ दिवसाच्या आत करारनामा करुन देणे (त्यामध्ये या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे नमुद करुन) बंधनकारक राहील.

स्वा/-

जिल्हाधिकारी वाशिम करीता

# जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
## प्रशासकीय इमारत, काटा रोड, वाशिम
## दुरध्वनी क्रमांक ०७२५२ २३४५०८ फॅक्स नं. ०७२५२-२३२८५८
rdc_washim@rediffmail.com


---

### इमारत स्वच्छते करीता लागणारे आवश्यक साहित्याची यादी

| साहीत्याची यादी | साहीत्याची प्रति संख्या | साहीत्याचे दर |
|---|---|---|
| डस्ट बिन मोठी | | |
| फिनाईल (५ लिटर पॅक कॅन) | | |
| टॉयलेट क्लीनर (५ लिटर पॅक कॅन) | | |
| नॅपथॅलीन बॉल्स | | |
| सर्फ पॅकेट | | |
| टॉयलेट ब्रश | | |
| कोलीन वाटर | | |
| हारपीक बॉटल मोठी | | |
| लॉयझॉल बॉटल मोठी | | |
| झाडू | | |
| खराटा मोठा. | | |
| पोछा करीता स्पंज | | |
| हॅन्डवॉश | | |
| एअर फ्रेशनर | | |
| जाळे काढण्याचा झाडु | | |
| वायफर | | |
| पोछाचे कापड | | |

स्वा/-
जिल्हाधिकारी वाशिम करीता